श्री.प्रशांत सुरेश लोंढे, आरोगय सेवक पु., उपकेंद्र-आडगाव बु., प्रा.आ.केंद्र-डो-हाळे, ता.राहाता यांचे अनाधिकृत गैरहजेरी प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करणेकामी चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/५१८ /२०२५
अहिल्यानगर दिनांक- /०५/२०२५
०५/०७/२०२५

**वाचा:-** १.वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र- डो-हाळे, ता.राहाता यांचेकडील पत्र क्र. आरोग्य/आस्था/६५६/२०२४, दिनांक-०८/१०/२०२४

२.या कार्यालयाकडील दोषारोपाचे ज्ञापन क्र. आरोग्य/कार्या-२/अस्था-३/८८/२०२५, दिनांक- ०१/०४/२०२५

३.वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र- डो-हाळे, ता.राहाता यांचेकडील पत्र क्र.आरो/६०/२०२५, दिनांक-२२/०४/२०२५

४.श्री.प्रशांत सुरेश लोंढे, आरोगय सेवक पु., यांचा दिनांक- १५/०५/२०२५ रोजीचा खुलासा

५.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) नुसार

श्री.प्रशांत सुरेश लोंढे, आरोगय सेवक पु., हे उपकेंद्र-आडगाव बु., प्रा.आ.केंद्र-डो-हाळे, ता.राहाता येथे कार्यरत असताना, विनापरवाना अनाधिकृत गैरहजर राहणे, तांत्रिक कामकाजाच्या निष्क्रियतेबाबत, वरिष्ठांनी दिलेल्या सुचनांचे व आदेशांची अवमान्यता करणे, कामकाजात हलगर्जीपणा करणे याबाबत संदर्भ क्र.१ चे पत्रासोबत वैदयकीय अधिकारी, प्रा.आ.केंद्र- डो-हाळे, ता.राहाता यांनी दोषारोप सादर केलेले आहे. सदर दोषारोपाचे अनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये या कार्यालयाकडील ज्ञापन/दोषारोप संदर्भ क्र.३ चे पत्रान्वये दिनांक- २२/०४/२०२५ रोजी बजाविण्यात आलेले असुन सदर दोषारोपपत्रामध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोप त्यांनी संदर्भ क्र.४ चे मुदतीत सादर न केलेल्या खुलाशान्वये स्पष्टपणे मान्य किंवा अमान्य केलेले नाहीत. श्री.प्रशांत सुरेश लोंढे, आरोगय सेवक पु., यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील (६) च्या तरतुदीनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी विशेष चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

पुढील पानावर....

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.प्रशांत प्रभाकर देवळालीकर, कक्ष अधिकारी, पंचायत समिती राहाता, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र. तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र.20250705100206 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 05-07-2025 13:52:45

(आनंद भंडारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक
सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते

२. श्री.प्रशांत प्रभाकर देवळालीकर, कक्ष अधिकारी, पंचायत समिती राहाता,
व्दारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहाता, ता.राहाता, जि.अ.नगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.प्रशांत प्रभाकर देवळालीकर, कक्ष अधिकारी, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते १७५ पृष्ठ असे

३. श्री.प्रशांत सुरेश लोंढे, आरोगय सेवक पु.,
व्दारा-वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-डो-हाळे, ता.राहाता, जि.अ.नगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.प्रशांत सुरेश लोंढे, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(आनंद भंडारी)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर